जावक क्र.कामगार/एमएमबी/०५/१५८७३
म.रा.वि.मंडळ क.अ.विश्वस्त संस्था,
प्रकाशगड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : २६.०५.२००५

# परिपत्रक

विषय : मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांना / वारसांना मंजूर करण्यांत आलेला मासिक निर्वाह भत्ता त्यांच्या मुलांच्या/मुलींच्या नांवाचे नामनिर्देशन केल्यानंतर आईच्या नांवे मंजूर करण्यांत आलेला निर्वाह भत्ता चालू ठेवण्याबाबत.

...............................................

मुख्य कार्यालय परिपत्रक क्रमांक २२५ दिनांक ८-७-१९९७ नुसार असे कळविण्यांत आले आहे की, सक्षम अधिकाऱ्यांनी विधवा अवलंबिताऐवजी त्यांच्या मुलास/मुलीस मासिक निर्वाह भत्ता प्रदान करण्यास निवड केल्यास व तसा सुधारित प्रस्ताव अशा वारसदारांची शिफारस करुन विश्वस्त समितीकडे पाठवून त्यावर मंजूरी झाल्यानंतरच दुसऱ्या वारसास मासिक भत्ता प्रदान करण्यांत येईल.

तथापि काही क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी विश्वस्त समितीकडे अशी विचारणा केली आहे की, मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास मासिक निर्वाह भत्ता मंजूर झाला असल्यास व अशा अवलंबितांनी त्यांच्या मुलास/मुलीस मासिक निर्वाह भत्ता मिळण्यासाठी नामनिर्देशन केले असल्यास त्यांच्या आईच्या नांवे मंजूर झालेला मासिक निर्वाह भत्ता बंद करावा किंवा चालू ठेवावा ?

याबाबतीत सध्या अस्तित्वात असलेल्या तरतूदींचा विचार करुन खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यांत येत आहे.

"मृत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास विश्वस्त समितीने मासिक निर्वाह भत्ता मंजूर केला असल्यास जर अशा अवलंबितांनी त्यांच्या ऐवजी त्यांच्या मुलास/मुलीस निर्वाह भत्ता मंजूर करण्यासाठी त्यांचे नांव नामनिर्देशन केले असल्यास व अशा नामनिर्देशनास (Change of Nomination) सक्षम अधिकाऱ्यांनी मान्यता दिल्यानुसार त्या नविन प्रस्तावास विश्वस्त समितीने मंजूरी दिली असेल तर त्याच्या पुढील महिन्यापासून संबंधित वारसदार मासिक निर्वाह भत्ता मिळण्यास पात्र होतील. तोपर्यंत त्यांच्या आईच्या नांवे मंजूर झालेला निर्वाह भत्ता चालू ठेवण्यांत यांवा. तथापि कोणत्याही परिस्थितीमधे विधवा पत्नीस मिळालेला मासिक निर्वाह भत्ता व मुलाच्या/मुलीच्या नांवाने मंजूर झालेला मासिक निर्वाह भत्ता याची एकूण मुदत १० वर्षापेक्षा जास्त कालावधीचा होणार नाही ही अट लागू राहील."

.......२/-

सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकाऱ्यांना असे कळविण्यांत येते की, मंडल कार्यालयामध्ये अशी काही प्रकरणे असल्यास त्यावर वरील स्पष्टीकरणानुसार कार्यवाही करण्यांत यावी व त्यांची नांवे विश्वस्ताकडे पाठविण्यात यावीत.

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
व
सदस्य सचिव, म.रा.वि.मं.क.अ.वि.संस्था

सर्व क्षेत्रिय मुख्य अभियंता / सह संचालक (आस्थापना), मुंबई